गांवकरी
www.gavakari.net
06 Mar 2024 - Page 2




# के. के. वाघमध्ये माजी विद्यार्थी उद्योजक मेळावा उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था नाशिकतर्फे माजी विद्यार्थी उद्योजक मेळावा नुकताच उत्साहात पार पडला. या उद्योजक मेळाव्यास ६० हून अधिक औद्योगिक, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी, औषधनिर्माण अशा विविध क्षेत्रांत मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यापैकी बहुतांश उद्योजक विविध कंपन्यांमध्ये उच्चपदावर कार्यरत आहेत.

याप्रसंगी अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे, समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर, डॉ. पी. जे. पवार, प्रा. व्ही. एस. कलमाणी, प्रा. एम. बी. झाडे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी उपस्थित उद्योजकांना मोलाचे मार्गदर्शन केले. औद्योगिक क्षेत्रात विविध पदांवर कार्यरत आहोत. त्याचे सर्व श्रेय के. के. वाघ शिक्षण संस्थेला जाते, अशा भावना उपस्थित उद्योजकांनी आपल्या मनोगतात व्यक्त केल्या. तसेच भविष्यात विद्यार्थ्यांच्या जडणघडणी, निधी उभारणी, प्रोजेक्ट, सेमिनार, ट्रेनिंग, औद्योगिक सहली, सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट आदींसाठी संस्थेने विनंती केल्यास, शक्य ती मदत करण्याची तयारी दर्शवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

सकाळ

# 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' माध्यमातून आर्थिक नियोजन

## के. के. वाघ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांकडून सॉफ्टवेअर

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १५ : भारतातील नागरिक भविष्यातील आर्थिक नियोजनाचा विचार करता किंवा सेवानिवृत्त झाल्यानंतर एकरकमी मिळणाऱ्या पैशांची गुंतवणूक करतात. आर्थिक साक्षरतेबाबत फारशी जनजागृती नसल्याने पैसा योग्य ठिकाणी कसा गुंतवावा, याचे नियोजन अनेकांकडे नसते. परिणामी इतरांच्या सल्ल्यानुसार कमी परतावा मिळाला तरी चालेल पण सुरक्षित ठिकाणी जिथे रिस्क नाही अशा ठिकाणी गुंतवणुकीला महत्त्व दिले जाते. याचा विचार करता के. के. वाघ इंजिनिअरिंगच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्सच्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या रिया जैन, अफ्फान शेख, अमोदी बाकळे, तनय शिंपी या विद्यार्थ्यांनी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून भविष्यकालीन आर्थिक नियोजन कसे करावे यासाठी सॉफ्टवेअर डिझाइन केले आहे.

एका नामांकित गुंतवणूक कंपनीने नुकतीच विद्यार्थ्यांसाठी हॅकेथॉन स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेत आयआयटी, एनआयटी सारख्या संस्थेतील विद्यार्थी सहभागी झाले. स्पर्धेची थीम निवृत्ती उद्योगात 'जेनेरेटिव्ह एआय' अशी होती. स्पर्धेत विद्यार्थ्यांना गुंतवणुकीबाबत कस्टमाइज प्लॅन विकसित करायचे होते. विविध राज्यातून २५०० संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. यातून या विद्यार्थ्यांनी पहिल्या पाच नंबरमध्ये येण्याचा मान मिळविला. त्यांना प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन मिळाले.



नाशिक : सॉफ्टवेअर डिझाईन करणारे रिया जैन, अफ्फान शेख, अमोदी बाकळे, तनय शिंपी.

### काय असते हॅकेथॉन स्पर्धा?

विविध नामांकित कंपन्या देशभरातील विद्यार्थ्यांसाठी हॅकेथॉन स्पर्धा घेतात. स्पर्धेच्या माध्यमातून आजचे विद्यार्थी काय विचार करतात, एखादी समस्या ते कशा पद्धतीने सोडवू शकता, याचा अंदाज घेण्यात येतो. विद्यार्थ्यांनी सुचविलेले पर्याय आयोजकांना आवडल्यास त्यावर पुढे अंमलबजावणी केली जाते. स्पर्धेत विद्यार्थ्यांना काही प्रश्न देण्यात येते. त्यानुसार त्याचे उत्तर शोधून काढण्याचे चॅलेंज या विद्यार्थ्यांसमोर असते.

### 'एआय' तंत्रज्ञान काय करते?

गुंतवणूक केवळ मोठ्या माणसांनी करावी हा विचार आता मागे पडत आहे. मिळणाऱ्या पॉकेटमनीतून शालेय जीवनापासून गुंतवणूक केली जाते. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या गरजेनुसार महिन्याचा खर्च किती आहे. त्यात कर, महिन्याचे हप्ते, कर्ज, नोकरीची सुरक्षितता, वार्षिक उत्पन्न आणि इतर स्रोत यांचा विचार करता एआय सॉफ्टवेअरच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला त्याच्या खर्चाच्या पद्धतीनुसार वेगवेगळे प्लॅनिंग मिळतात. अचानक अधिक पैशांची गरज भासल्यास काय करावे, त्याचबरोबर आजच्या तरुणांचा विचार करता एका ठिकाणी नोकरी न करता नोकरीत होणारे बदल, स्टार्टअप सुरू करायचे, व्हीआरएस घ्यायचे ठरविल्यास या सर्व शक्यता पडताळून नियोजन तयार केले जाते.

आपलं महानगर My महानगर

# के. के. वाघच्या ८ विद्यार्थ्यांना दुबईतील कंपनीत इंटर्नशिपची संधी



✦ **नाशिक** । के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील ८ विद्यार्थ्यांना दुबई येथील एलाईड कॉन्ट्रैक्टिंग व फाईव्ह होल्डिंग्स या दोन नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिप संधी मिळाली आहे. यामध्ये कॉम्पुटर सायन्स अँड डिझाइन विभागाचे चार, मेकॅनिकल एक, आयटी एक आणि सिव्हिल विभागाचे दोन असा एकूण ८ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना याचे मानधन देखील मिळणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचे संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांना इंटर्नशीप दरम्यान येणारे अनुभव त्यांच्या भावी वाटचालीस नक्कीच उपयोगी ठरू शकतात. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाला २०२२ मध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त दर्जा मिळाला आहे. त्या अंतर्गत अनेक नावीन्य पूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यामध्ये ६ महिन्यांची उन्हाळी किंवा हिवाळी इंटर्नशिपचा समावेश असेल, अशी माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. बंदी, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, संगणक विभाग प्रमुख प्रा. डॉ. साने, आय. टी. विभाग प्रमुख डॉ. पी. डी. भामरे व ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के शहाबादकर यांनी भावी वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



# के. के. वाघच्या ८ विद्यार्थ्यांना दुबईतील कंपनीत इंटर्नशिपची संधी

**नाशिक : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असणाऱ्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील ८ विद्यार्थ्यांना दुबई येथील एलाइड कॉन्ट्रॅक्टिंग व फाइव्ह होल्डिंग्स या दोन नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिप संधी मिळालेली आहे.

कॉम्पुटर सायन्स अँड डिझाइन विभागाचे ४, मेकॅनिकल १, आयटी १ आणि सिव्हिल विभागाचे २ अशा एकूण ८ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना याचे मानधन देखील मिळणार आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचे संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. परदेशी (फॉरेन) इंटर्नशिप ही संकल्पना के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने राबवत, मुलांना करिअरच्या अनुषंगाने नवनवीन संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकांनी आनंद व्यक्त केला.

विद्यार्थ्यांना इंटर्नशिपदरम्यान येणारे अनुभव त्यांच्या भावी वाटचालीस नक्कीच उपयोगी ठरू शकतात. तसेच के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाला २०२२ मध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त दर्जा मिळाला आहे. त्या अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यामध्ये ६ महिन्यांची उन्हाळी किंवा हिवाळी इंटर्नशिपचा समावेश असेल, अशी माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, संगणक विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एस. साने, आय.टी. विभागप्रमुख डॉ. पी. डी. भामरे व ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'गोएंका'तर्फे २०० विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण

प्रतिनिधी | नाशिक

रामाप्रसाद गोयंका ग्रुप अर्थात आरपीजी फाउंडेशनच्या वतीने के. के. वाघ महाविद्यालयाच्या तिसऱ्या वर्षातील १४५ विद्यार्थ्यांसाठी सुमारे २०० तासांची मोफत प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना कौल्शय विकासाचे धडे देण्यात आले. या सर्व प्रशिक्षित विद्यार्थ्यांना झेन्सार टेक्नॉलॉजीचे इएसडी ट्रेनिंग प्रोग्रॅम हेड गुरुराज कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.



गोयंका फाउंडेशनच्या प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थी.

या कार्यशाळेत कॉम्पुटर प्रोग्रामिंग, सॉफ्ट स्किल्स, ॲप्टिट्यूड टेस्ट, लीडरशिप तसेच मुलाखत कशी द्यावी व मुलाखतीची तयारी कशी करावी याचे प्रशिक्षण देण्यात आले. याप्रसंगी औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा उद्देश हा विद्यार्थ्यांना कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास असा होताा.

या माध्यमातून विद्यार्थ्यांना बायोडेटा लेखन, ॲप्टिट्यूड मॉक टेस्ट्स, मॉक इंटरव्ह्यू आणि सीईओ कनेक्ट आदी उपक्रमांचा समावेश असतो. संस्थेच्या वतीने आतापर्यंत ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेतलेला आहे. के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सर्व विश्वस्त मंडळांनी आरपीजी फाउंडेशनचे आभार मानले.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# के.के.वाघ अभियांत्रिकीच्या ६० विद्यार्थ्यांना नोकरी



**नाशिक।** के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक संचलित के. के. अभियांत्रिकी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील इलेक्ट्रिकल शाखेतील ६० हून अधिक विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटद्वारे विविध बहुराष्ट्रीय उद्योगसमूहां नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली आहे. विद्यार्थ्यांना सरासरी ५ लाख तर सर्वाधिक ९ लाखांपर्यंतचे पॅकेज मिळाले आहे.

२० हून अधिक नामांकित उद्योगसमूहांनी महाविद्यालयात मुलाखत घेत निवड केली. आयटी, कोअर व सर्व्हिस या उद्योगसमुहांचा समावेश आहे. प्रामुख्याने आर्सेलर मित्तल, निप्पोन स्टील, भारती एअरटेल आणि बर्न्स अँड मॅकडोनेल यांसारख्या नॅशनल व इंटरनॅशनल उद्योगसमूहांचा समावेश आहे.

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागामार्फत प्रथम ते अंतिम वर्षापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सी व्ही रायटींग, एप्टीट्यूड, मॉक टेस्ट, मॉक इंटरव्ह्यू या बाबींचा कार्यशाळेच्या माध्यमातून कौशल्य प्रदान केले जाते. याचा उपयोग विद्यार्थ्यांना मुलाखतवेळी नोकरी मिळवताना होत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, शकुंतला वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, संगणक विभाग प्रमुख डॉ. एस. एन. साने, डॉ. पी. डी. भामरे, डॉ. आर. के. मुंजे, ट्रेनिग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर व सर्व विभाग प्रमुख यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

AapleMahanagar Edition
Mar 11, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com